नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे | Year - 2nd | अंक - १८१ | Issue - 181 | वार सोमवार दि. १८ नोव्हेंबर २०२४ | Blow- Monday Date 18 November 2024 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

राज्यातील प्रचारतोफा आज थंडावणार

२८८ मतदारसंघांत बुधवारी मतदान; शनिवारी मतमोजणी

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मुंबई : विधानसभा निवडणूक प्रचाराच्या तोफा आज, सोमवारी संध्याकाळी ५ वाजता थंडावणार आहेत. बुधवारी राज्यातील सर्व २८८ मतदारसंघांमध्ये एकाच टप्प्यात मतदान होणार असून शनिवारी मतमोजणी होईल.

आरोप-प्रत्यारोपांनी गाजलेल्या प्रचाराची पातळी यंदा फारच खालावल्याचे निरीक्षण अनेकांनी नोंदविले. निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली आणि प्रचाराची रंगत वाढत गेली. 'बटेंगे तो कटेंगे' या घोषणेने उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी विदर्भात वातावरण तापविले. त्यापाठोपाठ राज्यातील प्रचाराची सुरुवात करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'एक है तो सेफ है' असा नारा दिला. मोदी आणि योगी आदित्यनाथ यांच्या या दोन घोषणांभोवती प्रचाराची दिशा फिरू लागली. महाविकास आघाडीच्या नेत्यांनी या दोन घोषणांवरून भाजपवर हल्ला चढविला. भाजपला देशाचे तुकडे करायचे आहेत, अशी टीका विरोधकांनी केली. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, काँग्रेस पक्षाध्यक्ष मल्लीकार्जुन खरगे, राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार, शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी भाजपच्या 'बटेंगे' आणि 'सेफ' या दोन घोषणांचा प्रचार सभांमध्ये समाचार घेतला. विशेष म्हणजे महायुतीचे घटक असले तरी राष्ट्रवादीच्या अजित पवार यांनी 'बटेंगे तो कटेंगे' या भाजपच्या घोषणेशी सहमत नाही, अशी भूमिका मांडली. 'बटेंगे आणि सेफ है' या दोन घोषणांमुळे मतांचे ध्रुवीकरण करण्याचा भाजपचा प्रयत्न होता. दुसरीकडे, या घोषणांच्या आधारे विरोधी मतांचे ध्रुवीकरण करण्यावर महाविकास आघाडीने भर दिला होता.

महायुतीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या धुळे, नाशिक, अकोला, नांदेड, चिमूर, सोलापूर, पुणे, संभाजीनगर, रायगड, मुंबई अशा दहा सभा झाल्या. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी भाजपचा किल्ला लढविला. याशिवाय योगी आदित्यनाथ, राजनाथ सिंग यांच्यासह भाजपशासित राज्यांचे मुख्यमंत्री प्रचारात सहभागी झाले होते. काँग्रेसमध्ये राहुल गांधी, प्रियंका गांधी, मल्लीकार्जुन खरगे आदी नेते प्रचारासाठी मैदानात उतरले होते. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार, शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपापल्या पक्षांच्या प्रचारासाठी दररोज किमान चार तरी सभा घेतल्या. प्रचारात नेहमीच आरोप-प्रत्यारोपांचा राळ उठते. पण यंदा प्रचाराची पातळी खालावली. शेवटच्या टप्प्यात नेतेमंडळींच्या हेलिकॉप्टर आणि गाड्यांची तपासणी वादात सापडली.

महायुतीने गॅरंटीची 'दशसूत्री' दिली तर त्याला महाविकास आघाडीकडून 'पंचसूत्री' सादर करून प्रत्युत्तर देण्यात आले. लाडकी बहीण योजनेवर महायुती व महाविकास आघाडीने जाहीरनाम्यांमध्ये भर दिला. महायुती आणि महाविकास आघाडीचे संयुक्त जाहीरनामे जाहीर करण्यात आले. मात्र शिवसेने (शिंदे) आणि राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षांनी आपले स्वतंत्र जाहीरनामे प्रसिद्ध केले नाहीत.

थोडक्यात

देशाला धोका देणाऱ्या काँग्रेसवर विश्वास ठेवू नका; योगी आदित्यनाथ

कोल्हापूर : 'फोडा आणि राज्य करा या इंग्रजांच्या नीतीचा काँग्रेस वापर करीत आहे. जातीजातींत भांडणे लावत आहे. देव, देश आणि धर्म याबाबत आस्था नसणाऱ्या आणि नीती, निर्णयक्षमता नसणाऱ्या, देशाला धोका देणाऱ्या या पक्षावर विश्वास ठेवू नका,' असे आवाहन करताना 'राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी महायुतीला बळ द्या,' असे आवाहन उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी केले.

कोल्हापुरात महायुती उमेदवारांच्या प्रचारासाठी योगींची तपोवन मैदानावर जंगी सभा झाली. या सभेत त्यांनी महाविकास आघाडीवर हल्लाबोल केला. या वेळी खासदार धनंजय महाडिक, धैर्यशील माने यांच्यासह राजेश क्षीरसागर, अमल महाडिक, राजेश क्षीरसागर, अशोकराव माने या उमेदवारांसह अनेक नेते उपस्थित होते.

मुख्यमंत्री योगी म्हणाले, 'सध्या महाविकास आघाडीच्या नेत्यांमध्ये नुरा कुस्ती सुरू आहे. ते एकमेकांना धोका देत आहेत. यांनी प्रथम हिंदूंना धोका दिला. आता देशाला धोका देत आहेत. देशाला धोका देण्याचा काँग्रेसचा इतिहासच आहे. त्यांच्या या वृत्तीमुळेच पाकिस्तानची निर्मिती झाली. हे सत्य ते मानायला तयार नाहीत. इंग्रजांचेच अंश असलेल्या काँग्रेसने त्यांच्याच 'फोडा राज्य करा' या नीतीचा वापर सुरू ठेवला आहे. जात, भाषा, प्रांत यावर आपआपसांत भांडणे लावण्याचे काम त्यांच्याकडून सुरू आहे. त्यांच्यामुळेच देशाला प्रत्येक वेळी अपमान सहन करावा लागत आहे.'

मणिपूरमध्ये हिंसाचार; अमित शाह यांच्या महाराष्ट्रातील सर्व सभा रद्द

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली : महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीच्या प्रचारासाठी आता केवळ दोन दिवस उरले आहेत. १८ तारखेला सायंकाळी प्रचाराच्या तोफा थंडावणार आहेत. यासाठी रविवार आणि सोमवारी जोरदार प्रचार करण्यासाठी राजकीय पक्ष सभा आणि मिरवणुकांचे आयोजन करत आहेत. अशावेळी भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी मात्र आपला प्रचार आधीच थांबविला आहे. मणिपूरमध्ये पुन्हा एकदा हिंसाचार उसळला असून परिस्थिति चिघळल्यामुळे अमित शाह तातडीने दिल्लीकडे रवाना झाले आहेत, अशी माहिती पीटीआय वृत्तसंस्थेने दिली आहे. मणिपूरच्या जिरिबाम जिल्ह्यात तीन महिला आणि तीन मुलांची हत्या झाल्यानंतर परस्थिती चिघळली आहे. त्यामुळे अमित शाह दिल्लीकडे रवाना झाले.



केंद्रीय गृहमंत्री अमित शहा हे रविवारी नागपूर जिल्ह्यातील काटोल, सावनेरसह विदर्भात गडचिरोली व वर्धा या ठिकाणी जाहीर सभा घेणार होते. १५ नोव्हेंबरला विदर्भात त्यांची यवतमाळ मातदार संघात उमरेखड येथे व चंद्रपूर जाहीर सभा होती . ती झाल्यानंतर रविवारी १७ नोव्हेंबरला त्यांची गडचिरोलीसह वर्धा आणि नागपूर जिल्ह्यात काटोल व सावनेर येथे त्यांची जाहीर सभा आयोजित करण्यात आली होती. अमित शहा यांचे शनिवारी रात्री नागपुरात आगमन झाले.त्यांचा खाजगी हॉटेलमध्ये मुक्काम होता. त्या ठिकाणी रात्री त्यांनी विदर्भातील काही भाजपा पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली. रविवारी सकाळी काटोल मतदार संघात चरणसिंह ठाकूर यांच्या प्रचारासाठी व त्यानंतर सावनेर मतदार संघात आशिष देशमुख यांच्या प्रचारासाठी सभा घेणार होते. त्यासाठी सकाळी १०.३० वाजता निघणार होते. त्यानंतर गडचिरोली आणि वर्धा येथे जाहीर सभा घेणार होते मात्र रविवारी सकाळी शहा यांच्या विदर्भातील चारही सभा झाल्याचे भाजपाकडून सांगण्यात आले.

शनिवारपासून मणिपूरमध्ये हिंसक परिस्थिती निर्माण झाली आहे. आंदोलनकारी जमावाने एका वरीष्ठ मंत्र्यांसह भाजपा आणि काँग्रेस पक्षाच्या आमदारांच्या घराबाहेर आग लावल्या आहेत. सुरक्षा दल राज्यात कायदा आणि सुव्यवस्थेतीची परिस्थिती राखण्याचा प्रयत्न करत आहे, मात्र त्यात त्यांना यश आलेले नाही.

संविधान बदलण्याची कुणाची हिंमत नाही : केंद्रीय मंत्री नितीन गडकरी

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

ठाणे : आणीबाणीच्या काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानाची ऐसीतैशी करणारे आता संविधान बचावासाठी गावभर फिरत असल्याचे सांगत संविधान आम्ही बदलणार नाही, कुणाला बदलू देणार नाही आणि कुणाची बदलण्याची हिंमत नाही, असे केंद्रीय रस्ते वाहतूक, महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी रविवारी ठाण्यातील जाहीर सभेत बोलताना सांगितले. आपण चांगल्या उपहारगृहात चवीसाठी तर शस्त्रक्रियेसाठी चांगल्या डॉक्टरांकडे जातो, त्यावेळी आपण जात पाहत नाही, मग निवडणूकीत आपण जात का बघतो, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला.

ठाणे शहरातील भाजपचे उमेदवार संजय केळकर यांच्या प्रचारासाठी केंद्रीय रस्ते वाहतूक, महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी रविवारी सायंकाळी ठाण्यात जाहीर सभा घेतली. या सभेत गडकरी यांनी काँग्रेसवर टीका केली. लोकसभा निवडणुकीमध्ये मोठ्या प्रमाणावर जातीवादाचे आणि सांप्रदायिकतेचे विष कालवत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान बदलणार असा अप्रचार करण्यात आला. आम्हाला ४०० जागा मिळाल्या तर आम्ही संविधान बदलू असा प्रचार करण्यात आला. परंतु आम्ही संविधान बदलणार नाही, बदलू देणार नाही आणि कोणाची बदलण्याची हिंमत नाही, असेही ते म्हणाले.

आणीबाणीच्या काळात काँग्रेसने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानाची दुरुस्ती केली. परंतु आमचे सरकार येताच आम्ही त्या दुरुस्त्यांमध्ये बदल केला. ज्या काँग्रेसने संविधानाची ऐसीतैशी केली, तीच काँग्रेस आता संविधान बचावासाठी गावभर फिरत आहे, अशी टीकाही त्यांनी केली. चुकीच्या आर्थिक धोरणामुळे गेल्या ६० वर्षांमध्ये देशाचा जेवढा पाहिजे, तेवढा विकास झाला नाही, आपला देश श्रीमंत आहे पण, जनता मात्र गरीब आहे, अशी टीकाही त्यांनी केली.

योग्य नीती, नेतृत्व आणि देशासाठी काम करणे, अशी मनोभावे आणि प्रामाणिकपणे इच्छा असली पाहिजे. अशीच इच्छा ठेवून आमच्या सरकारने काम केले, त्यामुळे जे ६० वर्षात काँग्रेस पार्टी करू शकली नाही, ते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली आमच्या सरकारने काम करून दाखवले, असेही ते म्हणाले. देशात प्रकल्पांच्या कामासाठी पैशांची कमी नसून इमानदार नेत्याची फक्त गरज आहे, असेही ते म्हणाले. छत्रपती शिवाजी महाराजांची शिवशाही ही महाराष्ट्रात आली पाहिजे, शिवशाही म्हणजे आदर्श राज्य निर्माण करण्याची संकल्पना आहे. अशीच इच्छा स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांची होती. सातत्याने तंत्रज्ञानात मोठे बदल होत आहेत. या तंत्रज्ञानाचा वापर करूनच आपण देशाच्या शाश्वत विकास केला पाहिजे, असेही ते म्हणाले.

तू राज्याच्या डोळ्यांवरील पट्टी काढलीस! ठाकरेंकडून भरसभेत पंकजा मुंडेंचे आभार

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मुंबई: यंदाची निवडणूक राज्याच्या भविष्याच्या दृष्टीनं अतिशय महत्त्वाची आहे. कारण महाराष्ट्रद्रोही विरुद्ध महाराष्ट्रप्रेमी अशी ही निवडणूक आहे, अशा शब्दांत शिवसेना उबाठाचे प्रमुख उद्धव ठाकरेंनी मुंबईतील बीकेसीत भाषण करताना महायुती सरकारला पराभूत करण्याचं आवाहन केलं. भाजपकडून राज्यात नेमकं काय केलं जातंय, हे सांगताना उद्धव ठाकरेंनी भाजप नेत्या पंकजा मुंडेंचे आभार मानले.

'मला पंकजा मुंडेंना धन्यवाद द्यायचे आहेत. कारण आमच्या महाराष्ट्राच्या डोळ्यावरची पट्टी तू काढलीस. पंकजा मुंडेंनी काय सांगितलंय, भाजपचं काम म्हणजे लय भारी असतं बघा. आपल्याकडे बूथ किती आहेत महाराष्ट्रभर? ९० हजार. प्रत्येक बूथवर एक दक्षता पथक आहे. ९० हजार बूथवर दक्षता पथकं म्हणजे एकापेक्षा अधिक माणसं असणार. एक माणूस जरी धरला तरी ९० हजार बूथवर ९० हजार माणसं. दोन धरली तर १ लाख ८० हजार. तीन धरली तर त्याच्या पटीत आणि सगळी माणसं गुजरातमधून भाजपनं इकडे आणली आहेत आपल्यावर नजर ठेवायला. आज नजर ठेवायला आणली आहेत. उद्या मुंबई बळकावण्याचा यांचा डाव आहे. हे काही फेक नरेटिव्ह नाही ना? हे उद्धव ठाकरे पंकजा मुंडे बोलल्यानंतर बोलतोय,' असं ठाकरे महाविकास आघाडीच्या सभेत म्हणाले.



गोगाव समस्त भीमनगरचे सचिन दादा कल्याणशेट्टीच्या पाठीशी राहण्यासाठी वज्रमूठ

कमलाकर सोनकांबळे यांचे आवाहन

भिमनगरला सर्वाधिक निधी देणारे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या पाठीशी समाजाने उभे राहावे

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

अक्कलकोट/ प्रतिनीधी

भीमनगर गोगांव येथील समाज बांधवांचे बैठक घेण्यात आले असून त्यात समस्त भीम नगर आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांच्या पाठीशी राहून एकजुठीने मतदान करण्याचे ठरले.

या मीटिंगचे अध्यक्षस्थानी नामदेव सोनकांबळे, कल्लपा बनसोडे, यशवंत गायकवाड, चीतानंद सोनकांबळे, हे होते उपसरपंच कमलाकर सोनकांबळे , भाजपा तालुका उपाध्यक्ष प्रदीप जगताप , शाम बाबर, महेश आलूरे , प्रदीप जगताप यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना नितीन गायकवाड म्हणाले की आपल्या समाजाच्या विकासासाठी आमदार सचिन दादा कल्याण शेट्टी यांनी मोठ्या प्रमाणात निधी दिले असून त्याच्या पाठीशी सर्वांनी खंबीर उभे राहून मोठ्या संख्येने मतदान करण्याचे आवाहन केले.

यावेळी बोलताना कमलाकर सोनकांबळे म्हणाले की, पाणीदार आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांनी अक्कलकोट तालुक्यात प्रथमच येवढ्या मोठ्या प्रमाणात मागासवर्गीय वस्तीला निधी मंजूर करून दिले.

साडे सतरा वर्ष आमदार, मंत्री पद भोगलेले कॉंगेस उमेदवार सिद्धाराम म्हेत्रे हे त्याच्या कार्य काळात आमच्या गोगांव मधील मागासवर्गीय वस्तीमध्ये निधी दिले नाहीत त्या उलट आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांच्या केवळ पाच वर्षाच्या कार्यकाळात कोरोना काळ वगळता फक्त दोन वर्षात आमच्या डॉ बाबासाहेब आंबेडकर नगर मध्ये विकासासाठी ६९ लाख निधी दिले असून त्याचे काम प्रगती पथावर आहेत मला अभिमान आहे आमदार सचिन दादा कल्याणशेट्टीचे ज्या ज्या वेळी आम्ही निधी मागणी केले त्या प्रत्येक वेळी आम्हला भरीव निधी दिले आहे. अक्कलकोट तालुक्यातील ग्रामीण भागामध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकर स्मारक गोगांव मध्ये होत असून त्याचे काम चालू आहे भविष्यात ही त्यासाठी निधी कमी पडू देणार नसल्याचे सांगितले आहेत समाजाच्या विकासासाठी प्रामाणिक काम करणाऱ्या लोक प्रतिनीधीना निवडून देणे गरजेचे आहे, ज्यांनी आपल्या समाजाला सतरा वर्ष फक्त मतासाठी वापरू करून घेतले परंतु वस्तीच्या विकासासाठी कधी निधी दिले नाहीत आपण सर्व जाणकार मतदार असून आपण स्वतः विचार करून आपल्या मनाला सचिन दादा नी काम केले असेल असं वाटलं तरच आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांना मतदान करा.

समाजाच्या विकासासाठी पुन्हा एकदा आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांना आमदार करण्यासाठी आपले अनमोल मत देऊन सहकार्य करावे. आपले मत म्हणजे विकासाला मत, आपले मत म्हणजे प्रगतीला मत, आपले मत म्हणजे समाजाच्या विकासाला मत आहे गेल्या दोन वर्षांत केलेले कामे डॉ बाबासाहेब आंबेडकर नगर गोगांव खडीकरण जी प समाजकल्याण सोलापूर ३ लाख , सिमेंट कॉंक्रिट जी प समाजकल्याण सोलापूर ३ लाख, स्मशन भूमी शेड जन सुविधा ३ लाख, डॉ बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन राज्य सरकार सामाजिक न्याय १० लाख, डॉ बाबासाहेब आंबेडकर सभागृह राज्य सरकार सामाजिक न्याय १० लाख, समाज मंदिर समोर पेव्हर ब्लॉक राज्य सरकार सामाजिक न्याय १० लाख, सिमेंट कॉंक्रिट राज्य सरकार सामाजिक न्याय १० लाख, सिमेंट कॉंक्रिट जी प समाजकल्याण सोलापूर ७ लाख, बंदिस्त गटार जी प समाजकल्याण सोलापूर ६ लाख, सिमेंट रस्ता जी प समाजकल्याण सोलापूर ७ लाख असे एकूण ६९ लाख पडसावळ रोड ते गायकवाड शेत पर्यंत मातोश्री पाणंद रस्ता मंजूर करण्यात आल्याचे सांगितले

महादेव सोनकवडे, विठल वाघमारे यांनी ही मार्गदर्शन केले. यावेळी समाज बाधव परमेश्वर गायकवाड, सुरेश सोनकांबळे, विनोद बनसोडे, आकाश गायकवाड, किरण गायकवाड, कलप्पा गायकवाड, लक्ष्मण गायकवाड, शांतकुमार गायकवाड, संजय गायकवाड, यासह युवक पुरुष महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित होते

मतांच्या राजकारण साठी समाजामध्ये भांडण पेटवून राजकीय पोळी भाजून घेणारे अनेक पुढारी आहेत आम्हाला राजकारण करायचं नाही समाजाच्या हितासाठी, विकासासाठी काम करायचं आपल्या वस्तीत बुद्ध विहार, डॉ बाबासाहेब आंबेडकर स्मारक , सम्यक अभ्यासिका केंद्र चालू करण्याचे आपले प्रयत्न असून या माध्यमातून समाजातील भावी पिढी शिकून प्रशासकीय अधिकारी, उद्योजक, नोकरदार वर्ग निर्माण करण्याचा प्रयत्न आहे आपले समाज शिकलं पाहिजे व त्याचे आर्थिक प्रगती झाले पाहिजे यासाठी आमचे मिशन चालू आहे.

संपादकीय....

दशसूत्री विरुद्ध पंचसूत्री

राज्यातील सर्व २८८ मतदारसंघांमध्ये एकाच टप्प्यात २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार असून शनिवारी २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी होईल. विधानसभा निवडणूक प्रचाराच्या तोफा आज, सोमवारी संध्याकाळी ५ वाजता थंडावणार आहेत. बुधवारी राज्यातील प्रचाराची सुरुवात करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'एक है तो सेफ है' असा नारा दिला. मोदी आणि योगी आदित्यनाथ यांच्या या दोन घोषणांभोवती प्रचाराची दिशा फिरू लागली. महाविकास आघाडीच्या नेत्यांनी या दोन घोषणांवरून भाजपवर हल्ला चढविला. भाजपला देशाचे तुकडे करायचे आहेत, अशी टीका विरोधकांनी केली. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, काँग्रेस पक्षाध्यक्ष मल्लीकार्जुन खरगे, राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार, शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी भाजपच्या 'बटेंगे' आणि 'सेफ' या दोन घोषणांचा प्रचार सभांमध्ये समाचार घेतला. विशेष म्हणजे महायुतीचे घटक असले तरी राष्ट्रवादीच्या अजित पवार यांनी 'बटेंगे तो कटेंगे' या भाजपच्या घोषणेशी सहमत नाही, अशी भूमिका मांडली. 'बटेंगे आणि सेफ है' या दोन घोषणांमुळे मतांचे ध्रुवीकरण करण्याचा भाजपचा प्रयत्न होता. दुसरीकडे, या घोषणांच्या आधारे विरोधी मतांचे ध्रुवीकरण करण्यावर महाविकास आघाडीने भर दिला होता. महायुतीने गॅरंटीची 'दशसूत्री' दिली तर त्याला महाविकास आघाडीकडून 'पंचसूत्री' सादर करून प्रत्युत्तर देण्यात आले. लाडकी बहीण योजनेवर महायुती व महाविकास आघाडीने जाहीरनाम्यांमध्ये भर दिला. महायुती आणि महाविकास आघाडीचे संयुक्त जाहीरनामे जाहीर करण्यात आले. मात्र शिवसेने (शिंदे) आणि राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षांनी आपले स्वतंत्र जाहीरनामे प्रसिद्ध केले नाहीत. महायुतीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या धुळे, नाशिक, अकोला, नांदेड, चिमूर, सोलापूर, पुणे, संभाजीनगर, रायगड, मुंबई अशा दहा सभा झाल्या. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी भाजपचा किल्ला लढविला. याशिवाय योगी आदित्यनाथ, राजनाथ सिंग यांच्यासह भाजपशासित राज्यांचे मुख्यमंत्री प्रचारात सहभागी झाले होते. काँग्रेसमध्ये राहुल गांधी, प्रियंका गांधी, मल्लीकार्जुन खरगे आदी नेते प्रचारासाठी मैदानात उतरले होते. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार, शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपापल्या पक्षांच्या प्रचारासाठी दररोज किमान चार तरी सभा घेतल्या. प्रचारात नेहमीच आरोप-प्रत्यारोपांचा राळ उठते. पण यंदा प्रचाराची पातळी खालावली. शेवटच्या टप्प्यात नेतेमंडळींच्या हेलिकॉप्टर आणि गाड्यांची तपासणी वादात सापडली.

भाजपाला मोठा धक्का; कॉनराड संगमा यांच्या 'एनपीपी'ने मणिपूर सरकारचा पाठिंबा काढला

नवी दिल्ली : गेल्या जवळपास वर्षभरापासून मणिपूरमध्ये हिंसाचाराच्या घटना सुरु आहेत. हिंसाचाराच्या घटनेत अनेक लोकांना आपला जीव देखील गमवावा लागला आहे. मात्र, तरीही हिंसाचाराच्या घटना कमी होताना दिसत नाहीत. यातच आता पुन्हा एकदा मणिपूरमध्ये हिंसाचार उसाळला असून परिस्थिती चिघळली आहे. या पार्श्वभूमीवर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी देखील उद्या तातडीने बैठक बोलावली असल्याची माहिती सांगितली जात आहे.

दरम्यान, भारतीय जनता पक्षाला मणिपूरमध्ये एक मोठा धक्का बसला आहे. मणिपूरमध्ये नॅशनल पीपल्स पार्टी (एनपीपी) आणि भाजपाची युती संपुष्टात आली आहे.

नॅशनल पीपल्स पार्टीने बिरेन सिंग सरकारचा पाठिंबा काढून घेतला आहे. तसेच कॉनराड संगमा यांच्या नेतृत्वाखालील नॅशनल पीपल्स पार्टीने राज्यातील सध्याच्या कायदा आणि सुव्यवस्थेबद्दल चिंता व्यक्त करत हा निर्णय घेतला आहे.

यासंदर्भात पक्षाचे प्रमुख कॉनराड संगमा यांनी भाजपा अध्यक्ष जेपी नड्डा यांना पत्र लिहून मणिपूरमधील कायदा आणि सुव्यवस्थेबाबत चिंता व्यक्त केली आहे. तसेच सरकार सध्याची परिस्थिती हाताळण्याच्या पद्धतीवर असमाधानी असून निष्पाप लोकांचं नुकसान झाल्यामुळे सरकारचा पाठिंबा काढून घेत असल्याची घोषणा कॉनराड संगमा यांनी केली आहे. तर एनपीपीचे मणिपूर विधानसभेत सात आमदार आहेत. यासंदर्भातील वृत्त इंडियन एक्स्प्रेसने दिलं आहे.

क्षमा करा... सुधारक गोपाळ गणेश आगरकर तुमचा पत्रकारिता वारसा आणि निवडणूक आरसा

निवडणुका आणि भारतीय प्रेस (पत्रकारिता) हा नाजूक हितसंबंधाचा विषय आहे .नव्वदच्या दशकानंतर पत्रकारिता हा आदर्श धबधबा आणि दखल हा विषय होता .महाराष्ट्रीयन पत्रकारिता हे आणखीन गौरवाची परंपरेची पत्रकारिता स्वतःच मानली जाते .मुठभर उच्च वर्ण यांच्या हातात असलेले मराठी पत्रकारिता ही तब्बल ९० च्या दशकापासून आज अखेर मूठभर वर्गाच्या हातात आहे.

पत्रकारितेतील वर्ग तग धरून राहिला टिकून राहिला विचारसरणीचे धूर्त राजकारण करीत राहिला ग्रामीण महाराष्ट्रातील बहुजातीय बहुसंस्कृतिक बहुविचार धारेच्या नवा पत्रकारांना रोखण्यामध्ये शहरी संपादकांनी धन्यवाद मांनले.

अशी ही महाराष्ट्राची शीतकालीन ९० नंतरची पत्रकारिता१९९४ते ९९ च्या कालखंडात जागृत झाले ऐकू न येणारे मुख्यमंत्री यांनी नवे पांयेडे खूप पाडले. कृष्ण खोरे विकास महामंडळाच्या स्थापनेपासून बॉण्डच्या खरेदी पर्यंत प्रचाराचा गदारोळ महाराष्ट्रात उठवण्यात आला तेव्हा महाराष्ट्र सरकारच्या पीआरओ चे काम बडेबडे पत्रकार करू लागले आणि त्यांच्या डोक्यातील कंपनीनुसार गाड्या वाटप कॅमेरे वाटप ही कल्पना निघाली. ते सर्व झाले साधन सुचिता संपली आणि कच्छपी पत्रकारिता सुरू झाले दरबारी पत्रकारितेचा प्रारंभ ९९ ला झाला मस्टर पे रोल वर पत्रकार राहू लागले आणि महाराष्ट्रातील पत्रकारिता ही राजकीय पक्षांच्या दावणीला बांधली गेले. तशी ती मेडिया हाऊसच्या उद्दिष्ट कलेक्शन साठी काम करीत होतीस आजही ती करीत आहे.

अशा या पत्रकारितेच्या निवडणुकीच्या कालखंडामधील वर्तनाचीचर्चा होत नाही. निवडणुकांच्या मध्ये खोट्या बातम्या विरोधी बातम्या बातम्यातील करणे हे प्रकार ९९ ते २०१० पर्यंत खूप काही महाराष्ट्रात चालू होते हे सगळे प्रकार निर्भय पत्रकारिता निष्पक्ष पत्रकारिता बुलंद आवाज या नावाने करत होते लोक वर्तमानपत्र वाचतात आपण लोकांच्या हातात जातो लोकांचे मत बनवतो. मत कलुषित करतो हवी त्यांची बदनामी करतो. हवे त्यांना मोठे करतो हा अहंकार बाळगून महाराष्ट्रातील पत्रकारिता तब्बल दोन दशके पुढे चालत राहिले या पत्रकारितेने महाराष्ट्राला राजकीय साक्षर केले नाही ज्ञान साक्षर केले नाही संविधान साक्षर केले नाही फक्त राजे करण्यातील सत्ता आणि सत्तेच्या वर्तुळातील असंख्य पात्रांची करमणूक आणि उद्योग वृत्तपत्रे मांडत राहिले. पॉलिटिकल जर्नालिझम म्हणून स्वतःची पाठ थोपटत राहिली महाराष्ट्रातील हिंदुत्वाचा नंगानाच यांनीच खपवून घेतला महाराष्ट्रातील वृत्तपत्रांनी जातीय दंगलींचा बॉम्बस्फोटांचा मालेगाव नांदेड मुंबई पुणे कितीतरी ठिकाणचा अंतिम शोध घेऊन गुन्हेगार दाखवण्यापर्यंत शोधक पत्रकारिता केली नाही. दक्षिण महाराष्ट्रातील अनेक ठिकाणचे हिंदुत्वांच्या दर्गे मशिदी विध्वंस या प्रकरणावर पत्रकारिता दातखिळी बसल्यासारखी गप्प बसली आणि महाराष्ट्राचे सामाजिक सांस्कृतिक ऐक्य उद्धवस्त करण्यामध्ये पत्रकारितेने आपले दुष्ट कर्तव्य बजावले असे म्हटले तर या क्षेत्रातील एका संवेदनशील पत्रकाराला वेदना झाल्याशिवाय राहत नाही हे सर्व उघड डोळ्याने पाहावे लागत होते.

महाराष्ट्राच्या सर्व वर्तमानपत्रात उजव्या विचारसरणीचे उन्मादी हिंसक कारवायांना समर्थन देणारे या हिंदुत्ववादी संघटनांचे व्यवस्थापन करणारे अनेक उपसंपादक मशहूर पत्रकार बातमीदार आजही काम करत आहेत यांनी माध्यमातून मालकाची चाकरी नागपूरची नोकरी आजही चालवले आहे .

प्रेस यामध्ये अनेक घटक येतात. यांनी राजकीय पक्षांच्या गुन्हेगारी वर्तनावर तब्बल वीस वर्षे डोळ्यावर पट्टी बांधून वर्तन चालवले आहे जाहिरात आणि वृत्तपत्र हा एक हितसंबंधांचा सहमती आणि मंजुरी चा मामला बनला आहे यामुळे वृत्तपत्रे सोयीचे सत्य सोयीचे असत्य राजकीय पक्षांचे मांडत राहिले आणि राजकीय संस्कृती महाराष्ट्रातील गुन्हेगारीकडे रूपांतरित झाली.

प्रेस मध्ये आम्ही तुम्हाला मोठे करतो तुम्हाला प्रसिद्ध देतो हा अहंकार आजही कालपासूनचा इतका टोकाला गेला आहे की आपले कर्तव्य न्याय मांडणे वस्तुनिष्ठ वार्तांकन आणि जनसाक्षरता या उद्दिष्ट पासून प्रेस दूर झाली आहे प्रेस म्हणजे तथाकथित बातमीदारांची अमाप प्रसिद्धी आणि खोटी प्रतिष्ठा प्रस्थापित करण्याचे माध्यम असा एक प्रकार रूढ झाला आहे

८० च्या दशकातील पत्रकारिता संपादकांचा सय्यतपणा विवेकी वर्तन जातिविहीन वर्तन वस्तुनिष्ठ व पक्ष विरहित संपादन दृष्टिकोन हा महाराष्ट्राच्या पत्रकारितेचा आदर्श होता आजही काही अंशी तो आहे मात्र ही गौरवशाली परंपरा कथनात सतत सांगायचे आणि वर्तनात संकीर्ण उजव्या विचारसरणीचे वर्तन करायचे हा महाराष्ट्राच्या पत्रकारितेचा आजचा आवडता नित्य उद्योग टोकाला गेला आहे त्यामुळे राजकीय पक्ष हे (पाळीव) प्रेम मळ प्राण्यासारखे माध्यमांना प्रेसला वापरतात का? याच्या आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे

राजकीय पक्षांची वर्तमानपत्रे त्यांचीच मीडिया हाऊस ही जेव्हा साकारली तेव्हापासून भारतीय प्रेस ही मृत्युपंथाला लागली असे धाडसाने कोणी नमूद करणार नाही. भारतीय प्रेस ही सोयीची मांडणी करणारी धाडस दाखवणारी आणि सूड उगवणारी अशी रूपांतरित तब्बल दहा वर्षात झाली आहे. नेता आणि बाबू यांच्या प्रस्थापित राजकारणाचे काम प्रेस करू लागले बाबूची खुशामत करण्यात भारतीय प्रेस मश्गुल राहिले आणि तिला बाबूची खप्पा मर्जी म्हणजे आपली स्वतःची आदर्श पत्रकारिता मानणारी भारतीय प्रेस ही बाबूचा पट्टा गळ्यात बांधून फिरू लागले नेत्याचा पट्टा काल गळ्यात होता आज मात्र बाबूंनी नेतात हे दोन पट्टे भारतीय प्रेस च्या गळ्यात बांधलेले सहज दिसून येते..

भारतीय प्रेस ही वार्तांकन सोडून विश्लेषण सोडून शोधक पत्रकारिता सोडून ती उदात्तीकरणाचे नित्य काम करण्यात धन्यथा मागून लागली आहे. प धर्ा फाश अपवादाने करणारी भारतीय प्रेस ही ९०% अत्याचाराच्या प्रकरणाला अंधार कोठडीत टाकून देण्याचे काम नित्य प्रामाणिकपणे करू लागली याचा कालखंड म्हणजे गत दहा वर्षाचा कालखंड होय.

निवडणुकांनी भारतीय प्रेस म्हणजे एक नाजूक अंतर्गत गुप्त उद्दिष्ट पूर्तीचा असा एक नवा वर्तन व्यवहार बनला आहे थेट प्रेस विकत घ्या प्रेसला कामकाजाची उद्दिष्ट द्या प्रेसची जागा घ्या प्रेसला हवे ते मॅटर द्या असा एक बाजारी व्यवस्थेतला निवडणुकीच्या प्रसिद्धी विभागाचा एक नवा विभाग निवडणुकीच्या काळात सुरू झाला आज तो प्रस्थापित झाला आहे पेड न्यूज ही भारतीय प्रेस मधली महार रोगाची अवस्था आहे पेड न्यूज च्या पलीकडे टारगेट न्यूज हा नवा प्रकार प्रस्थापित झाला आहे पॅकेज आणि टारगेट यांची पडताळणी राजकीय पक्ष करतात आणि आपले निवडणुका पार पाडतात आता भारतीय प्रेस मध्ये औषधांची एजन्सी ते वाळूचे ठेके ते शस्त्र परवाने ते सर्व प्रकारची कामे नेता प्रेसची करू लागला आहे आणि प्रेस जनसामान्यांच्या मध्ये ऐरावत सारखा समज जीवनात उजळ माथ्याने जगतो आहे वावरतो आहे भारतीय प्रेस हा नेत्यानंतर सर्वोच्च प्रतिष्ठित असल्याची भावना बाळगून समाज आघात करत आहे.

भारतीय प्रेस ला समाज जीवनातल्या सर्व विकारांचि लागण झाली आहे भारतीय प्रेस कालच्या सर्व गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या नेत्यांची प्रसिद्धी टोकाला जाऊन करण्यामध्ये स्वतःची बौद्धिक कौशल्य तो पणाला लावू लागला आहे त्यामुळे राजकारणाचे गुन्हेगारीकरण याचे सर्व श्रेय न्यायव्यवस्था पोलीस यंत्रणेला जेवढे देता येते तेवढेच श्रेय भारतीय प्रेसला राजकारणाचे गुन्हेगारीकरण झाल्याबद्दल द्यावे लागते.

निवडणुका आणि प्रेस ही गुप्ततेची गोष्ट असता कामा नये निवडणुका विश्वासहार्यता पारदर्शकता आणि सार्वभौम मताचा कौल या पद्धतीने पार पाडल्या जायला हव्यात मात्र निवडणुका आणि प्रेस यांची गुप्तता ही वाढत चालली आहे निवडणुकीच्या काळात भारतीय प्रेस ची दातखिळी बसलेले असते तो बोलत नाही तो लिहीत नाही तो टीका करत नाही जाहीरनामा विश्लेषण करत नाही उमेदवाराचे प्रगती पत्रक सखोलपणे अपयशासह मांडत नाही उमेदवारांनी विकासाचा कल्याण निधी याचा अपहहा र कसा कसा केला हे मांडत नाही.

एकूणच भारतीय प्रेस जातीयवादी भांडवलवादी मालक वादी पक्षवादी आणि वाचक फसवणूक वादी अशी होत नाही ना!? असा प्रश्न, भारतीय प्रेस मधील प्रत्येक घटक स्वतःला विचारेल का? याची उत्तरे स्वतःच्या मनात जाऊन तपासले का? हे सगळे आत्मपरीक्षणाची प्रश्न आहेत हे भारतीय प्रेस सशक्त करण्यासाठी आवश्यक आहे भारतीय प्रेस स्वातंत्र्य चळवळीतून तयार झाली आहे जगभरच्या अविष्कार स्वातंत्र्यातून मूल्य प्राप्त करून सशक्त होत गेलेली भारतीय पत्रकारिता या दशकात अशी दुबळी होत जाणे हे लोकशाही खिळखिळी करण्याचे लक्ष नाही का,?

भारतीय प्रेस ही वंचितांचा शोषितांचा आवाज स्वातंत्र्यानंतर पूर्णता बनली नाही भारतीय प्रेस भांडवलदार सरंजाम व राजकीय पक्षांची घराणी परंपरा जपण्यातच विकसित होत पुढे आली आहे आणि त्यामुळे भारतीय प्रेस ही जनसामान्यांचा न्यायाचा आक्रोश सतत सार्वत्रिक सर्व ठिकाणी बनलेली नाही भारतीय प्रेस फार केवळ ज्ञान मनोरंजनाचा खेळ नाही हा कला संस्कृतीचा उदाती करण्याचा गौरवी करण्याचा प्रयत्न नाही तर जनसामान्यांच्या जगण्याचे अधिकार न्यायव्यवस्था शासन यंत्रणा व प्रशासन यांच्याकडून प्राप्त करून देण्यासाठी सतत कटिबद्ध असलेली भारतीय प्रेस आहे दरवर्षी जगातील जवळपास २०० ते ३०० पत्रकार प्राणाला मोफत आहेत जागतिक प्रेस चागौरवशाली वारसा प्रस्थापित करत आहेत जगण्याचा अधिकार अभिव्यक्तीचा अधिकार प्रस्थापित करत आहेत आणि म्हणून भारतीय प्रेस ही या सशक्त जागतिक चळवळीचा भाग बनणे अत्यंत आवश्यक आहे जगातील सर्व सत्ताधार्यांना सर्व कार्पोरेट भांडवलदारांना त्या त्यावेळी ती जागा दाखवण्याचे काम जगातील प्रेसने केले आहे भारतीय प्रेस वंशवादी सरंजामांना कार्पोरेट नवघरण्यांना प्रस्थापित करण्याचे काम करत आहे इथला लोकशाहीचा जनसामान्यांचा हक्क हिरावला जात असताना जागल्याची भूमिका भारतीय प्रेस निभावत असल्याची खून कुठे दिसून येत नाही.

भारतीय प्रेस ही अर्ध साक्षर देशातील नागरिकांची निरक्षर गोष्ट राहिली आहे प्रेस चे राजकारण प्रचार अर्थकारण प्रेस चे जातीयवादी वर्तन प्रेसचा आंतरराष्ट्रीय भांडवलदारांशी संबंध आणि प्रेस चे स्थानिक सर्व घटकांशी असलेले संबंध याचे किंचितही ज्ञान नसलेला भारतीय समाज हा प्रेस च्या अज्ञानात आपल्या दुःखाचे कटू अनुभव घेत पुढे चालला आहे आणि अशाच कालखंडामध्ये सामाजिक ऐक्य अखंडता शांती सदभाव उध्वस्त करणाऱ्या निवडणुका आणि बदनामी आणि खोटे बोलणे ही दोनच शस्त्रे हातात घेऊन सत्ता ताब्यात घेणारे उमेदवार किती फसवणूक करतात ?किती आश्वासने देतात? किती मत विकत घेतात?

भारतीय प्रेस मध्ये निवडणुकीच्या काळात मतदारांना विकत घेण्याचे प्रकार घडलेले घडत असलेले घडवले जात असलेले याची मांडणी होत नाही भारतीय प्रेस ही रात्रीचा खेळ चाले अशा पद्धतीमध्ये रूपांतरित होत आहे भारतीय प्रेस रात्रीच्या खेळातील साक्षीदार ठरत आहे भारतीय प्रेस उमेदवारांचे काळे कारणामे उघड करण्यात रस दाखवत नाही. निवडणूक ही फसवणूक घडत असताना भारतीय प्रेस फसवणुकीच्या विरोधात काम करताना मोठ्या प्रमाणात आढळत नाही निवडणुका म्हणजे फसवणूक निवडणुका म्हणजे मतांची चोरी सार्वभौमाची चोरी यामध्ये सशक्त प,हारा भारतीय प्रेस देत असल्याचे दिसून येत नाही.

भारतीय प्रेस ही स्वातंत्र स्वातंत्र्याच्या चळवळीतील नायक होती बहुसंस्कृतिक भारताचा एकात्मिक पाया बांधण्यामध्ये ज्ञान विश्लेषण करणारी प्रमुख होती भारतीय प्रेस स्वातंत्र्य चळवळीतील सैनिक होती भारतीय प्रेस सुधारकांच्या विचाराचे विश्लेषण करणारी निष्ठावंत ज्ञानवृत्ती होती भारतीय प्रेस हा नवसमाज निर्मानाचा स्वप्न वाद होता. भारतीय प्रेस हा समानता प्रस्थापित करणारा स्वातंत्र्याचे नवे विकसित जीवन मूल्य भारतीय नागरिकांच्या जीवनात प्रस्थापित करण्यासाठी कटिबद्ध असलेला असा आदर्श ज्ञान व्यवहार होता भारतीय प्रेस हे धैर्य होते भारतीय प्रेस हा प्रश्न विचारणारा मूक समाजातील पहिला आवाज होता.

भारतीय प्रेस लोकशाहीच्या संरक्षकाची भूमिका बजावणारा ९० च्या दशकापर्यंतचा कटिबद्ध असा राष्ट्रभक्तीचा वसा होता भारतीय प्रेस धर्मपलीकडचे मानव मुक्तीचे तत्त्वज्ञान रुजवणारा विश्लेषक वर्ग होता भारतीय प्रेस हा मानवी मूल्यांची सतत जनजागराची भूमिका निभावून नेत होता जल जमीन जंगल हे संरक्षित केले पाहिजे भूमिपुत्र हा सर्वश्रेष्ठ आहे अशी मांडणी करणारा भारतीय प्रेस हा आजही लोकशाहीची हाक आहे तो निवडणुकीच्या तात्कालिक भेटीत रममान न होणारा हा आदर्श प्रस्थापित करण्याचे काम नागरिकांनाच करावे लागणार आहे नागरिकांनाच नोटा निवडणुकीत मतदार वापरतात इतपत खरे आहे पण भारतीय प्रेस बाबत नोटा वापरण्याचे एक निर्भय साक्षर मन वाचक विश्वात तयार झाले नाही तर भारतीय लोकशाहीच्या अंधकार चाललेल्या वाटचालीकडे हा प्रवास रोखण्यामध्ये भारतीय प्रेस नाही असा एक इतिहास सध्या घडतो आहे

पुढील पिढ्या मात्र भारतीय प्रेस मध्ये वाचकांनी जनतेने नोटा का वापरला नाही असा निष्कर्ष पुढील कालखंडात सतत काढत राहतील तेव्हा लोकशाही ही व्यवस्था धन दांडगे जात दांडगे धर्म दांडगे गुन्हेगार दांडगे यांच्यापासून वाचवण्यात भारतीय प्रेस व यशस्वी झाले असा अंतिम निष्कर्ष काढतील हे होऊ द्यायचे नसेल तर भारतीय प्रेस ही पुनर मूल्याधिष्ठित प्रस्थापित करण्यासाठी विवेकाचे भान असलेल्या लोकशाहीची जाण असलेल्या मुठभर प्रेस व्यक्तीने पुढे येण्याची गरज आहे तरच भारतीय प्रेस आणि निवडणुका यांच्यातला अंधकार युगाचा नाते व्यवहार हा नाहीसा करता येईल.

शिवाजी राऊत , सातारा

सामाजिक भान जागृत असणारे विद्यार्थी घडवणे हे शिक्षकांचे कर्तव्य : शिक्षणतज्ञ हेरंब कुलकर्णी

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर/प्रतिनिधी : 'आपले विद्यार्थी स्वावलंबी बनण्यासाठी साने गुरुजींनी आपले आयुष्य समर्पित केले. १८९९ ते १९५० या त्यांच्या ५१ वर्षाच्या आयुष्यामध्ये साने गुरुजींनी विद्यार्थ्यांचे आयुष्य घडवण्यासाठी, त्यांना आकार देण्यासाठी आणि त्यांच्या शिक्षणासाठी आयुष्य वेचले. साने गुरुजींच्या व्यक्तिमत्त्वाचा अभ्यास करताना त्यांच्यातील विविध पैलू समोर येतात. साने गुरुजी हे संवेदनशील होते त्यामुळे त्यांचे विद्यार्थी हे शिकून मोठे व्हावेत असे त्यांना सतत वाटायचे.

त्यांनी सेवेचे, समाजाचे मूल्ये जपली. गुरुजींनी गरिबी जवळून अनुभवली होती. गुरुजी स्वतः शाळेत लावण्याची भित्तिपत्रके तयार करायचे आणि नित्य नियमाने ते शाळेत लावायचे. शिक्षणाबरोबरच संस्कार देणे व सामाजिक भान जागृत असणारे विद्यार्थी घडवणे हे शिक्षकांचे कर्तव्य आहे.' असे प्रतिपादन शिक्षणतज्ञ हेरंब कुलकर्णी यांनी केले.

गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग(ऑटोनॉमस),कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (डिप्लोमा),

स्वेरीत 'साने गुरुजी आणि शिक्षक' या विषयावर मार्गदर्शन सत्र संपन्न

कॉलेज ऑफ फार्मसी(डिग्री), कॉलेज ऑफ फार्मसी (डिप्लोमा), तसेच कासेगाव (ता पंढरपूर) मधील श्री. विठ्ठल इन्स्टिट्यूट ऑफ प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन संचलित लोटस इंग्लिश स्कूल व इन्स्टिट्यूट ऑफ कॉम्प्युटर अँड मॅनेजमेंट स्टडीज(आयसीएमएस) मधील शिक्षकांसाठी स्वेरीच्या इंटरनॅशनल कॉन्फरन्स हॉलमध्ये खास शिक्षकांसाठी 'साने गुरुजी आणि शिक्षक' या विषयावर आयोजिलेल्या या मार्गदर्शन सत्रामध्ये अकोले (जि. अहमदनगर) मधील शिक्षणतज्ञ हेरंब कुलकर्णी हे मार्गदर्शन करत होते. पुढील महिन्यात (दि.२४ डिसेंबर २०२४)साने गुरुजींची १२५ वी जयंती आहे त्या निमित्त हेरंब कुलकर्णी हेपांडुरंग सदाशिव साने उर्फ साने गुरुजींच्या जीवनावर राज्यभर व्याख्यान देत असून साने गुरुजींच्या जीवनाचे व कार्याचे महत्व सांगत आहेत. स्वेरीमध्ये २५ वे पुष्प गुंफत असताना सानेगुरुजींच्या विविध पैलूंवर ते प्रकाश टाकत होते. स्वेरीचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. पुढे बोलताना हेरंब कुलकर्णी म्हणाले की, 'साने गुरुजी हे आपल्या पगारातून विद्यार्थ्यांची फी भरायचे. विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यासाठी आपण किती समर्पण करू शकतो? हे साने गुरुजींच्या कृतीतून समजते तसेच गुरुजी प्रेमळ वआक्रमक देखील होते. विद्यार्थी का शिकले नाहीत यासाठी शिक्षकांना जबाबदार ठरवणाऱ्या पालकांना साने गुरुजी वेळप्रसंगी ठणकावून जाब विचारायचे. आजचा जमाना हा करिअर घडविण्याचा असताना साने गुरुजींचे विद्यार्थ्यांना शिकविण्याचे कार्य अधिक महत्त्वाचे वाटते.' असे सांगून साने गुरुजींच्या अनेक कवितांवर प्रकाश टाकून त्यांचे अर्थ स्पष्ट केले. अध्यक्षीय भाषणातून स्वेरीचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे म्हणाले की, 'अवघड कार्य करताना सामाजिकतेचे भान जपले पाहिजे. विद्यार्थ्यांचे करीअर घडवणाऱ्या शिक्षकांचे कार्य तर सर्वोतम तर आहेच परंतु पालकांनी देखील विद्यार्थ्यांच्या उज्वल करिअरसाठी सतर्क राहणे अत्यंत गरजेचे आहे.' असे सांगून 'साने गुरुजी आणि पंढरपूर' यांचे नाते सांगून साने गुरुजींच्या जीवनातील विविध घटनांवर लक्ष केंद्रित केले. शिक्षणतज्ञ हेरंब कुलकर्णी यांनी आपल्या दोन तासाच्या मार्गदर्शनामध्ये साने गुरुजींच्या शिक्षण पद्धतीतील महत्त्वाचे टप्पे सांगितले. यावेळीस्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम. एम पवार, बी.फार्मसीचे प्राचार्य डॉ. एम.जी.मनियार, कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (डिप्लोमा) चे प्राचार्य डॉ.एन.डी. मिसाळ, डी. फार्मसीचे प्राचार्य प्रा. एस. व्ही. मांडवे, कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) च्या उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, प्रा. शेळके, विद्यार्थी अधिष्ठाता डॉ. एम.एस.मठपती, सांस्कृतिक कार्यक्रम विभागप्रमुख डॉ. आर. एन. हरीदास, सर्व अधिष्ठाता, विभागप्रमुख प्राध्यापक वर्ग व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. प्रथम वर्ष अभियांत्रिकीचे विभागप्रमुख डॉ.यशपाल खेडकर यांनी सूत्रसंचालन केले तर लोटस इंग्लिश स्कूलच्या प्राचार्य डॉ.जयश्री चव्हाण यांनी आभार मानले.

'आपण घरी आल्यानंतर पूर्णपणे आपला पूर्ण वेळ मोबाईल मध्ये न घालवता परिवार, मित्रपरिवार आणि पुस्तके यामध्ये घालवावा कारण आता अलीकडच्या सोशल मीडियाच्या युगात वाचन संस्कृती बंद होण्याच्या मार्गावर आहे. 'वाचनाने आयुष्याला दिशा मिळते' यासाठी वाचन संस्कृती जपणे आवश्यक आहे.' असे आवाहन हेरंब कुलकर्णी यांनी केले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

अभिजीत पाटील यांना विजयी करा : शरद पवार

महाविकास आघाडीच्या तिन्ही उमेदवारांच्या प्रचारार्थ टेंभुर्णी येथे जाहीर सभा

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर/प्रतिनिधी : माढा विधानसभा मतदारसंघातील शरदचंद्रजी पवार यांनी टेंभुर्णी येथील सभेत पंढरपूर मंगळवेढा , मोहोळ , माळशिरस, या तिन्ही मतदारसंघातील महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार अभिजीत धनंजय पाटील माढा, राजू खरे, मोहोळ, उत्तम राव जानकर माळशिरस, या तिन्ही मतदारसंघातील महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार आहेत यांना प्रचंड बहुमताने विजयी करा असे आव्हान टेंभुर्णी येथील झालेल्या जाहीर सभेत शरदचंद्रजी पवार यांनी सांगितले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी
शरदचंद्र पवार
परिवर्त

यावेळी टेंभुर्णी येथील सभा झाल्यानंतर माढा विधानसभेचे महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार यांनी करकम येथील कार्यकर्ते व तेथील नागरिकांना संवाद साधताना त्यांनी संबोधित केले की करकम हे एक मॉडेल तयार करायचे आहे आपल्याला त्यासाठी आपल्याला तेथील नवीन नवीन सुधारणा करण्यात चे आहेत त्यामध्ये कृषी उत्पन्न बाजार समितीची स्थापना करायची आहे तसेच तेथील प्रत्येक गाव व खेडे हे रस्ते हे डांबरीकरण चे रस्ते तयार करायचे आहेत त्याचप्रमाणे करकम या भागात आपल्याला पत्रकार भवन सुद्धा उभा करायचे आहे.

अशा प्रकारच्या करकम मध्ये नवनवीन सुधारणा करून आपल्याला कर्कम एक मोठे मॉडेल बनवायचे आहे अशा प्रकारचे आश्वासन अभिजीत पाटील यांनी करकम येथील महाविकास आघाडीचे कार्यकर्ते व तेथील नागरिकांना आश्वासन संबोधित करण्यात आले

यानंतर पुढे बोलताना त्यांनी आपला विजय हा निश्चित आहे पण आपल्याला शरदचंद्र पवार यांना माढा मतदारसंघातून जास्तीत जास्त लीड देऊन उमेदवार महाविकास आघाडीचे त्यांचे चिन्ह तुतारी वाजवणारा माणूस व दोन नंबरचे बटन दाबून प्रत्येकाला सांगून जास्तीत जास्त मतदान करावे व प्रचंड मताने निवडून द्यावे असे त्यांनी महाकाय सागरची कार्यकर्ते व तेथील नागरिकांना संबोधित केले

तसेच माढा मतदारसंघातील अपक्ष उमेदवार रणजीत शिंदे यांच्यासमोर मोठे आव्हान उभे करण्यात आले आहे

सुरक्षा रक्षक असल्याचे सांगून भाविकांची फसवणूक करणारा तोतया इसमावर गुन्हा दाखल

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर/प्रतिनिधी : श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसरात शंकर चनाप्पा भोसले हा इसम मंदिर समितीच्या कंत्राटी सुरक्षा रक्षकाचा पेहराव घालून भाविकांकडून पैसे घेऊन श्री विठ्ठल रुक्मिणी चे दर्शन देतो असे सांगून भाविकांची फसवणूक करताना दिसून आल्याने त्याच्यावर मंदिर समिती मार्फत गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

दिनांक १७ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ वाजता दर्शनरांगेतील स्थानिक नागरिक / दुकानदार मीनाक्षी जोशी यांना एक इसम, कासार घाट येथे दर्शनबारीत संशयरीत्या तिथे उभा असल्याचा दिसून आला व तो भाविकांना तुम्हाला दर्शन करून देतो, असे म्हणून त्यांच्याकडून पैसे घेत असताना निदर्शनास आल्याने, त्यांनी मंदिर समितीचे तेथील कर्मचारी रोहित दगडू जानगवळी व ऋतिक कल्याण काळे यांना कळवले. तदनंतर माहिती घेऊन संबंधित इसम शंकर चन्नप्पा भोसले रा. रांजणी ता. पंढरपूर यांचेवर मंदिर समितीचे सुरक्षा विभाग प्रमुख राजाराम मारुती ढगे यांनी पंढरपूर शहर पोलीस ठाणे येथे भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम ३१८ (४) व ३१९ (२) अन्वये रितसर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मंदिर समितीकडून करण्यात आला गुन्हा दाखल

मंदिर समितीच्या वतीने असे आवाहन करण्यात येते की, श्रींचे दर्शनासाठी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती मार्फत कोणतेही शुल्क आकारले जात नाही. दर्शन हे संपूर्णतः निशुल्क आहे. त्यामुळे भाविक भक्तांनी कोणासही श्री चे पदस्पर्श दर्शनासाठी आर्थिक व्यवहार करू नये. तसेच अशी फसवणूक करणाऱ्या व्यक्तीची माहिती कार्यालयास तात्काळ द्यावी. मंदिर समिती अशा व्यक्तीवर कायदेशीर कारवाई करेल, असे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी यावेळी सांगितले.

श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरास रवींद्र भांबरे या भाविकांकडून १ लाख रूपयाची देणगी

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर/प्रतिनिधी : श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरास रवींद्र भांबरे, सटाणा (जि.नाशिक) येथील भाविकानी १ लाख १११ रूपयांची देणगी दिल्याची माहिती व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.

दिनांक १७ नोव्हेंबर रोजी देणगीदार श्री विठ्ठल रूक्मिणीमातेच्या दर्शनासाठी श्रीक्षेत्र पंढरपूरला आले असता, त्यांनी मंदिरे समितीस दान दिले असून, देणगीदार श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे निस्सिम भक्त आहेत.

या दानशुर देणगीदाराचा मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीच्या सहाय्यक विभाग प्रमुख मनीषा जायकर यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा व उपरणे देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी कर्मचारी अनंता रोपळकर उपस्थित होते.

पूल, इमारती म्हणजे विकास नव्हे! सुप्रिया सुळे यांनी पक्षातील फुटिरांना फटकारले

मुंबई : विकासाच्या मुद्द्यावर आम्ही भाजपबरोबर गेलो, असा दावा पक्षातील फुटिरांकडून वारंवार केला जातो. पण विकास म्हणजे फक्त पूल वा इमारती बांधणे एवढेच नसते. सशक्त लोकशाहीत विरोधी पक्षाची जबाबदारी मोठी असते. केवळ खुर्ची, सत्ता मिळाली म्हणजे विकास होतो हा गैरसमज आहे, अशा शब्दांत राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी 'लोकसत्ता लोकसंवाद' कार्यक्रमात अजित पवार व त्यांच्या सहकारी आमदारांना फटकारले. तसेच निवडणुकीत महागाई, बेरोजगारी आणि शेतकऱ्यांची दुरवस्था हे मुख्य मुद्दे असल्याचेही त्यांनी सांगितले. राष्ट्रवादीतील फूट, अजित पवारांचे राजकारण, बारामतीमधील लढत, आई प्रतिभा पवार यांनी प्रचारात उतरणे, लाडकी बहीण योजना अशा अनेक मुद्द्यांवर सुप्रिया सुळे यांनी परखड मते मांडली. 'अजित पवारांपासून पक्षातून बाहेर पडणारे सारे नेते विकासासाठी आम्ही भाजपबरोबर गेलो हा दावा करतात तेव्हा आश्चर्य वाटते.

आदिवासी समाजाने कर्मकांडे त्यागून स्वत:चे अस्तित्व निर्माण करावे

मुन्नाभाई नंदागवळी यांचे प्रतिपादन: बाराभाटी येथे बिरसा मुंडा जयंती उत्सव साजरा

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

नवेगावबांध : आदिवासी समाज हा निसर्ग पुजक आहे. जंगलात राहणारे नागरिक म्हणजे या देशाचे, समाजाचे रक्षण करणारे समाजाचे नागरिक आहेत. हल, नांगर, जमीन, जल व जंगल या सर्वांचे रक्षण करुन आपली वेगळी ओळख समाजासाठी निर्माण करणारे आदिवासी समाजाचे क्रांतीनायक बिरसा मुंडा यांच्या कार्याने प्रेरित व्हायला पाहिजे. समाजाला दिशाभूल करणारे अंधश्रद्धा, थोतांड व कर्मकांडे यांचा त्याग करून आदिवासी समाजाने आपले स्वतःचे अस्तित्व निर्माण करावे. असे प्रतिपादन कार्यक्रमाचे मुख्य मार्गदर्शक मुन्नाभाई नंदागवळी यांनी केले. ते जयंती उत्सव कार्यक्रमात बोलत होते.

यावेळी मंचावर दादाजी चूलपार यांच्या अध्यक्षतेखाली प्रमुख अतिथी मनोहर कांबळे, तुलाराम मारगाये, प्रभाकर दहिकर, ज्ञानू प्रधान, धम्मदीप मेश्राम, दिलवर राम टेके, प्रफुल्ल वालदे, भगवान नंदेश्वर, तोताराम गणविर, विलास बंसोड, करुणा नांदगावे, महाराज दादाजी मेश्राम, शंकर धानगाये, सरपंचा सरस्वता चाकाटे, दुधराम घरतकर, हेमराज बेलखोडे, लीलाधर चुटे, यादोराव बेलखोडे, श्रीराम ताराम आदी मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी बिरसा मुंडा, माता दंतेश्वरी, विरसिह गेंदलाल नाईक, राणी दुर्गावती, शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महापुरुषांच्या प्रतिमांना हार अर्पण करून दीपप्रज्वलनाने अभिवादन करण्यात आले. तसेच गावातील व बाहेरगावातील आलेले बिरसा मुंडा जयंती निमित्त सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण करण्यात आले. अनेक मान्यवर उपस्थितांपैकी मार्गदर्शन केले. अशाप्रकारे सदर जयंती कार्यक्रम तीन दिवसीय असून वेगवेगळे कार्यक्रम आयोजित करण्यात आले. आदिवासी समाजातील अधिकारी व कर्मचारी यांचा सत्कार समारंभ करण्यात आले.

पुढे नंदागवळी म्हणाले- आदिवासी समाजाने डोळे झाकून राहू नये, आपली ओळख तयार करावी व स्वाभिमानाने जगावे, असे मौलिक आपल्या वाणीतून उपस्थित आदिवासी समाजातील नागरिकांना ज्ञानाचे मार्मिक डोज पाजले. सदर कार्यक्रम (दि. १६-११) रात्री ०८.०० वाजता, स्थानिक ठिकाणी बिरसा मुंडा चौक, केजाजी महाराज मंदीराच्या बाजूला बाराभाटी येथे संपन्न झाला.

कार्यक्रम प्रास्ताविक राजेश चूलपार यांनी करून संचालन व आभार जागेश्वर आंदे यांनी मानले. तर यशस्वीतेसाठी विजय चाकाटे, संजय चव्हारे, युवराज ताराम, अन्ना ताराम, धर्मेंद्र घरतकर, मेघराज ताराम, लालचंद मारगाये, कमलेश आंदे, कमलेश चव्हारे व समाज बांधवांनी परिश्रम घेतले.

थोडक्यात...

जोडभावी पेठ पोलीस ठाणे हद्दीतून दोन मोटरसायकली पळवल्या

सोलापूर, (प्रतिनिधी) : शहरात दिवसेंदिवस मोटरसायकल चोरीत वाढ होत आहे. जोडभावी पेठ पोलीस हद्दीतील घरासमोर पार्क केलेल्या मोटरसायकली चोरून नेल्याच्या घटना घडल्या. स्वप्निल शिवशरणप्पा ढगे (रा.भवानी पेठ, सोलापूर) यांनी आपल्या दारात ठेवलेली मोटरसायकल क्रमांक एम.एच.१३.ए.डी.१०१९ ही १५ नोव्हेंबर रोजी मध्यरात्रीच्या सुमारास अज्ञात चोरट्याने चोरून नेली. तर दुसऱ्या घटनेत शब्बीर लिहाकत इनामदार (रा. साखरपेठ सोलापूर) यांनी चाटी गल्लीत हँडल लॉक करून ठेवलेली मोटरसायकल क्रमांक एम.एच.१३.ए.व्ही.६०१६ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेली. दोन्ही घटनेची नोंद पोलीस ठाण्यात झाले आहे. घटनेचा अधिक तपास पोलीस हवालदार अरेनवरू व शिवशरण हे करत आहेत.

पैशाची मदत का करत नाही अशी विचारणा करत मारहाण

सोलापूर, (प्रतिनिधी) : प्रत्येक वेळी मी तुला पैशाची मदत करतो.तू मला का मदत करत नाही असे म्हणून फिर्यादीस घटनेच्या मारहाण झाली. या घटनेची हकीकत अशी की,फिर्यादी सागर दिलीप शिंदे (रा.धाराशिव) हा मित्र अजिंक्य सुरवसे असे दोघे मिळून मोटरसायकल वरून संशयित आरोपी शिवम कांबळे (रा.जुना पुना नाका सोलापूर) यास फोन करून भेटावयास गेले असता शुभम कांबळे याने सागर शिंदे यास शिवीगाळ करून मारहाण केली.त्यानंतर सायंकाळी पुन्हा सागर शिंदे व अजिंक्य हे दोघे शुभम कांबळेच्या घरी भेटावयास गेले असता शुभम कांबळेचे सासरे अजय साळुंखे यांनी सागर यास चापट मारली. तसेच शुभम कांबळे, नम्रता कांबळे, नम्रताची आई वडील, आकाश चाठी, अजय साळुंखे या सर्वांनी मारहाण केली. फौजदार चावडी पोलीस ठाण्यात पाच जणांच्या विरोधात फिर्याद दिली असून, पाच जणांवर गुन्हा दाखल झाला आहे.

पैसे देण्याघेण्याच्या कारणावरून मारहाण; ७ जणांवर गुन्हा

सोलापूर, (प्रतिनिधी) : पैसे देणे घेण्याच्या कारणावरून एकास शिवीगाळ करून मारहाण केली.तसेच त्याचे पाकीट काढून त्यातील रोख ७ हजार रुपये, आधार कार्ड, पॅन कार्ड काढून घेतले. सदर बझार पोलीस ठाण्यात या घटनेची नोंद झाली आहे. फिर्यादी क्षितीज सावळे (रा.मजरेवाडी) यास एका अनोळखी मोबाईल धारकाने फोन करून तू लक्ष्मण मेरगुचा मालक बोलतो का तो आमचे पैसे देणार आहे.त्याचे पैसे लवकरात लवकर देऊन टाक असे म्हणून शिविगाळ केली. त्यानंतर फिर्यादी क्षितिज साळवे यांनी फोन करून तुला माझा नंबर कोणी दिला,अशी विचारना केली असता त्याने पठाणाने नंबर दिला असे सांगितले. त्यानंतर फिर्यादीने पठाण यास फोन केले असता, पठाण याने तुम्हाला फोन केलेला व्यक्तीला पैसे देऊन टाका. मिरगुचे पगारीचे पैसे द्यावे लागतील. बाकी काही कारण सांगू नका. नाहीतर तुम्हाला धक्काला लावेन असे म्हणून दमदाटी करत शिवीगाळ केली. त्यानंतर दुपारी दोनच्या सुमारास मुस्लिम कब्रस्तान वाशिंग सेंटर येथे फिर्यादी हा संशयित आरोपी पठाण उर्फ लक्ष्मण माने यास भेटावयास गेला असता त्या ठिकाणी लक्षण माने व त्याच्या सात ते आठ जणांनी मारहाण केली. तसेच खिशातील पाकीट चोरून नेले. सदर बझार पोलीस ठाण्यात ७ जणांवर गुन्हा दाखल झाला आहे.या घटनेचा अधिक तपास पोलीस नाईक कामूर्ती हे करत आहेत.

३ लाख ७६ हजार ८८० रूपयेचा मुददेमालासह एक वाहन जप्त

निरीक्षक पंकज कुंभार यांची माहिती

राज्य उत्पादन शुल्क पंढरपूर विभागाची धडक कारवाई

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर/प्रतिनिधी : विधानसभा निवडणूक २०२४ पार्श्वभूमीवर आचारसंहिता कालावधीमध्ये राज्य उत्पादन शुल्क विभाग, पंढरपूर यांनी केलेल्या धडक कारवाईमध्ये आज वाखरी (ता. पंढरपूर) या ठिकाणी देशी मद्याची अवैध वाहतूक करत असताना चारचाकी वाहनासह मद्यसाठा जप्त करून उमेश हिरालाल चव्हाण रा. भाळवणी याच्याविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला असल्याची माहिती निरीक्षक पंकज कुंभार यांनी दिली.

देशी दारु
देशी दारु
देशी दारु

सदर गुन्ह्यात जप्त करण्यात आलेल्या चारचाकी वाहन क्रमांक एम एच १३ एफ के ६०३७ असून मुद्देमालाची एकूण किंमत ३ लाख ७६ हजार ८८० रुपये इतकी आहे. सदरची कारवाई , पुणे विभागाचे विभागीय उपायुक्त सागर धोमकर याच्या निर्देशानुसार, राज्य उत्पादन शुल्क सोलापूर अधीक्षक श्रीमती भाग्यश्री जाधव, उपअधीक्षक एस .आर पाटील याचे मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहे. त्याचा पुढील तपास सुरू आहे.

संबंधित गुन्ह्याचा पुढील तपास निरीक्षक श्री. पंकज कुंभार हे करत आहेत.

सदरची कारवाई निरीक्षक पंकज कुंभार, दुय्यम निरीक्षक श्रद्धा गडदे, बापू चव्हाण, स. दु. नि. श्री. गुरुदत्त भंडारे जवान श्री. विजय शेळके, प्रकाश सावंत, विनायक वाळूजकर व वाहचालक रामचंद्र मदने यांनी पार पाडली.

अवैध मद्यविक्री अवैध धंदे व वाहतूकी विरोधात कारवाई या पुढेही चालू राहणार असून अवैध मद्याबाबत माहिती असल्यास टोल फ्री १८००२३३९९९९ क्रमांक अथवा व्हॉटस प क्रमांक ८४२२००११३३ या कार्यालयास माहिती दिल्यास माहिती देणाऱ्याचे नाव गुप्त ठेवले जाईल असे निरीक्षक पंकज कुंभार यांनी सांगुन अवैध मद्याबाबतची माहिती कळविण्याचे आवाहन केले आहे.

पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघ कायम साहेबांच्या पाठीमागे राहिला आहे; अनिल सावंत हे आमदार व्हावेत : सुप्रिया सुळे

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर मंगळा मतदार संघाचे महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार अनिल सावंत यांच्या प्रचारार्थ छत्रपती शिवाजी महाराज चौक, आठवडा बाजार स्थळ मंगळवेढा, या ठिकाणी आज रविवार दिनांक १७ नोव्हेंबर रोजी राष्ट्रवादी काँग्रेस सर चंद्र पवार पक्षाची जाहीर सभा पार पडली. पंढरपूर मंगळवेढा विधानसभेचे महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार अनिल सावंत यांच्या प्रचारार्थ ही सभा खासदार सुप्रिया सुळे यांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आले होते.

या सभेला राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते माजी मंत्री लक्ष्मणराव ढोबळे, माजी जिल्हा परिषद सदस्य वसंत नाना देशमुख, इतिहासकार डॉक्टर श्रीकांत कोकाटे, संतोष नेहतराव, पुनम अभंगराव, राजश्री ताड, वृषाली इंगळे, शुभांगी ताई, साधना राऊत, चारुशाला कुलकर्णी, पूर्वा ताई , अनिल पवार, सुनंदा उमाट, रेखाताई, काजल भोरकडे, सुभाष भोसले, संदीप मांडवे, दामोदर देशमुख, राहुल शेठ शहा, दत्ता भोसले, सुधीर भोसले, सुधीर अभंगराव, आबासाहेब माने चंद्रशेखर कोंडुभैरी उपस्थित होते.

थोडक्यात...

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाला धमकीचा फोन!

मुंबई : गेल्या काही दिवसांपासून विमानतळ तसेच शाळा महाविद्यालयांसह विविध ठिकाणी बॉम्बस्फोट करण्याची धमकी देण्यात देत आहे. अशातच आता रिझर्व्ह बँक ऑफ इंडियालाही अशाचप्रकारच्या धमकीचा फोन प्राप्त झाला आहे. रिझर्व्ह बँकेच्या कस्टमर केअर नंबरवर हा धमकीचा फोन करण्यात आला आहे. त्यामुळे आता खळबळ उडाली आहे. इंडिया टुडेने दिलेल्या वृत्तानुसार, शनिवारी सकाळी १० च्या सुमारास कस्टमर केअरला हा फोन करण्यात आला आहे. यावेळी समोरच्या व्यक्तीने आपण लष्कर-ए-तोयबाचा सीईओ असल्याचं सांगितलं आहे. तसेच मागचा रस्ता बंद करा, इलेक्ट्रिक कार खराब झाली आहे, असं म्हणत त्याने फोन ठेवला. त्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांनी बँकेच्या सुरक्षा रक्षकाला जाऊन तपासणी करण्यात सांगितले. मात्र, त्याठिकाणी अशी कोणतीही गाडी आढळून आलेली नाही. दरम्यान, या घटनेची गांभीर्याने दखल घेत रिझर्व्ह बँकेच्या अधिकाऱ्यांकडून माता रमाबाई मार्ग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यानंतर आता याप्रकरणाचा तपास सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितलं.

कुरनूर ते अक्कलकोट समातंर पाईपलाईनचे काम प्रगतीपथावर

३४ वर्षांचे संकट होणार दूर; पाणीटंचाई प्रश्न मिटला

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

अक्कलकोट/प्रतिनिधी : श्रीक्षेत्र अक्कलकोट शहराला रोज पाणी पुरवठा होणे कामी कुरनुर ते अक्कलकोट नवीन समांतर पाईपलाईन काम जोमाने सुरू झाले आहे. ७२ कोटी रुपये निधी मंजूर करण्यात आला आहे. एकंदरीत ३४ वर्षाचे संकट दूर होणार आहे.

१९९२ पासून अक्कलकोट शहर पाणी पुरवठा सुरळीत नसल्याने शहरवासीयाना याचा सतत त्रास होत होता. अनेक वेळा नागरिकांनी मोर्चा, उपोषण, आंदोलन केले. तरीही त्यात काही मार्ग निघत नव्हते. अखेर केंद्र शासनाकडून अमृत २.० या योजने मधून तब्बल ७२ कोटी रुपये निधी मागील महिन्यात मंजूर करण्यात आला. त्याचे तात्काळ कामाला सुरुवात करण्यात आले आहे. सदर कामामुळे शहर वासीयांचे मागील अनेक वर्षाची पाणी टंचाई मिटणार आहे.

अक्कलकोट ते कुरनुर १६ किलोमीटर अंतराचे समांतर पाईपलाईन करणे कामाला सुरू झाले आहे. शहरात विविध ठिकाणी नवीन जलकुंभ काम अंतिम टप्प्यात आहे. जलशुद्धीकरण केंद्र सहा एमएलडी क्षमतेच असणार आहे. ७२ किलोमीटरचे नवीन वितरण पाईपलाईन शहरात टाकण्यात येणार आहे. सध्या कार्यरत असलेले जलशुद्धीकरण केंद्राचे बळकटीकरण, नवीन विद्युतीकरण करणे, ११ हजार ५०० ग्राहकांना मीटर बसवणे, असे विविध प्रकारचे कामे करण्यात येणार आहे.

अक्कलकोट शहरा बरोबर मैदर्गी, दुधनी या दोन्ही शहरासाठी सुद्धा सदर योजना मंजूर करण्यात आला आहे. याही शहराचे पाणी टंचाई विषय फार जुनी होत. कुरनुर धरणातून योजना राबवून पुढील पन्नास वर्षाचे प्रश्न मार्गी लावला आहे.

केंद्र शासनाच्या अमृत २.० पाणी पुरवठा योजनेसाठी ७२ कोटी रुपये निधी मंजूर झाला आहे. त्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. सर्व कामे अद्यावत पणे सुरू आहे. काम पूर्ण होताच श्रीक्षेत्र अक्कलकोट शहराला रोज पाणी पुरवठा करणे कामी मदत होणार आहे.

– मनोज ईश्वरकट्टी
पाणी पुरवठा अधिकारी,
न. प. अक्कलकोट

तीर्थक्षेत्र अक्कलकोट शहराचे पाणी टंचाई प्रश्न फार जुनी होती. याबाबत सतत आंदोलन, मोर्चा निघत होते.ते आता होणार नाही. सदर योजने मुळे स्वामी भक्तांना होणारे त्रास कमी होणार आहे. तसेच मैंदर्गी, दुधनी याही शहराना सदर योजना मंजूर करण्यात आला आहे. सदर काम सुरू युद्धपातळीवर सुरू झाले आहे. योजना पूर्ण होताच तिन्ही शहराला रोज पाणी पुरवठा होईल.हे माझ्या कालावधीत सुरू झाल्याने मला समाधान वाटत आहे.

– आमदार सचिन कल्याणशेट्टी

कुरनुर ते अक्कलकोट समांतर पाईपलाईन सुरू असलेले दिसत आहे.

मी पाण्यासाठी १९९२ च्या आंदोलनात होतो. माझ्यासह अनेकांवर केसेस दाखल झाले होते. अनेक वर्षे कोर्टात हेलपाटे मारत होतो. आत पाणी टंचाई प्रश्न मिटणार असल्याने मला समाधान होत आहे. त्यावेळी सुरू केलेल्या चळवळीला यश आले असे म्हणता येणार आहे.

– राजाभाऊ मचाले.

दैनिक समर्थ गांवकरी कार्यालयास थोर समाजसेवक नानजीभाई ठक्कर ठाणावाला यांची सदिच्छा भेट

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

अकोले/प्रतिनिधी : महाराष्ट्रातील ख्यातनाम समाजसेवक नानजीभाई खेमजीभाई ठक्कर ठाणावाला यांनी नुकतीच अकोले येथील दैनिक समर्थ गांवकरी कार्यालयाला सदिच्छा भेट दिली. त्यांच्या या भेटीत त्यांनी वर्तमानपत्राची कार्यप्रणाली समजून घेतली आणि दैनिक अंकाचे वाचन करून त्यावरील चर्चा केली. महाराष्ट्रात विशेषतः मराठी वर्तमानपत्र चालवणे किती आव्हानात्मक आहे, यासंदर्भात त्यांनी सविस्तर विचारमंथन केले.

नानजीभाई ठक्कर ठाणावाला यांनी आपल्या भाषणात मराठी पत्रकारितेच्या संघर्षमय प्रवासावर प्रकाश टाकला. त्यांनी सांगितले की, मराठी वर्तमानपत्र चालवणे हे सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक दृष्टीने किती कठीण कार्य आहे. वर्तमानपत्र टिकून राहण्यासाठी पत्रकार आणि संपादकांना सातत्याने नवीन प्रयोग आणि बदल स्वीकारावे लागतात. यासाठी लोकशिक्षण आणि जनजागृती हे पत्रकारितेचे महत्त्वाचे घटक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

या प्रसंगी दैनिक समर्थ गांवकरी चे संपादक आणि महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे यांनी नानजीभाई ठक्कर यांचा मानपत्र, स्मृतिचिन्ह, शाल, आणि पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला. डॉ. आरोटे यांनी आपल्या भाषणात ठक्कर ठाणावालांच्या सामाजिक कार्याचा उल्लेख करताना म्हटले की, नानजीभाई यांच्या समाजसेवेमुळे संपूर्ण महाराष्ट्र प्रेरणा घेऊ शकतो. त्यांच्या कार्यातील निः स्वार्थ आणि सातत्य ही प्रत्येक सामाजिक कार्यकर्त्यासाठी मार्गदर्शक ठरावी.

कार्यक्रमात उपस्थित असलेल्या प्रमुख व्यक्तींमध्ये परीघा आरोटे, अस्मिता पाडेकर, अर्जुन पाडेकर, अकोले ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेचे संचालक सुरेश शिंदे, एल. आय. सी. अधिकारी जीवन पाडेकर, आणि विशाल आवारी यांचा समावेश होता. या प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी मराठी पत्रकारितेच्या भवितव्यावर व समाजातील तिच्या महत्वावर सखोल चर्चा केली.

सत्कार समारंभाच्या वेळी उपस्थितांनी दैनिक समर्थ गांवकरी ची कार्यप्रणाली आणि तिच्या सामाजिक योगदानाचे कौतुक केले. मराठी वर्तमानपत्रांच्या समोर असलेल्या आर्थिक, तांत्रिक, आणि सामाजिक आव्हानांवर मात करण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजनांची चर्चा करण्यात आली. डॉ. आरोटे यांनी सांगितले की, वर्तमानपत्र हे केवळ माहितीचे साधन नसून लोकांच्या मनात जागृती निर्माण करणारे साधन आहे. पत्रकारांना समाजाच्या हितासाठी सचोटीने काम करणे आवश्यक आहे.

दैनिक समर्थ गांवकरी च्या संस्थापकांनी भविष्यात अशा कार्यशाळा, चर्चासत्रे आणि सामाजिक संवाद चालू ठेवण्याचा संकल्प व्यक्त केला, ज्यामुळे मराठी पत्रकारितेच्या कार्याला अधिक व्यापक आधार मिळेल आणि समाजसेवेची परंपरा अधिक बळकट होईल.

कार्यक्रमानंतर उपस्थितांनी ठक्कर ठाणावालांच्या विचारांचे आणि समाजसेवेचे महत्त्व अधोरेखित केले. यावेळी उपस्थितांनी त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेत नवनवीन उपक्रम राबवण्याचे ठरवले. यामुळे पत्रकारिता आणि समाजसेवा या दोन्ही क्षेत्रांचा परस्परसंबंध अधिक दृढ होईल, असा आशावाद व्यक्त करण्यात आला.

बोगस महिला उभे करून विधवा महिलेची जागा हडपली

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर शहरांमधील विधवा महिलेची जमीन हडपण्याचा प्रकार पंढरपूर मध्ये उघड की साला आहे. बोगस महिला उभी करून या जमिनीचा खरेदी विक्री व्यवहार झाल्याची धक्कादायक नावे पुढे आले आहेत ह्या प्रकरणी पंढरपुरातील नामांकित बिल्डर आणि एजंट सहचार जनावर न्यायालयात आदेशाने गुन्हा दाखल झाले आहेत.

नामांकित बिल्डर एजंटसह चार जनावर गुन्हा दाखल

यात हकीकत अशी की श्रीमती हर्षदा हेमंत शुक्ला नामक विधवा महिलेची मौजे हिजवाई पंढरपूर नगरपालिका अधिकारी गट क्रमांक ११९/४ प्लॉट क्रमांक ५९ हे अशी एकूण क्षेत्र २७८.८५ चौरस मीटर ही जागा सन २००१ स*** फिर्यादी यांनी खरेदी केली होती परंतु सदर महिला वयोवृद्ध असल्याकारणाने तिचे सदर जागीकडे जाणे येणे कमी असल्याच्या गैरफायदा घेऊन येतील आरोपी यांनी संगमत करून श्रीमती हर्षदा शुक्ला यांचे बनावट आधार कार्ड तयार इतर कागदपत्रे तयार करून पंढरपूर कार्यालय येथे त्याच्या जागी कोणतीही बनावट महिला उभी करून दिनांक १/०७/२०२२ रोजी दस्त क्रमांक ३१ ४५ या दस्ताने सरस्वती मसु माने या महिलेच्या नावावरती सदर प्लॉट खरेदी केला तर नंतर दिनांक २६/८/२०२२ रोजी दस्त क्रमांक ४०२९ सरस्वती माने इच्छा नावावरून राजू विठ्ठल खंडागळे यांच्या नावावर प्लॉट केला तर नंतर सदर जागेवर आरसीसी बांधकाम करून सदर घटनेची पोलिसांनी दखल न घेता सदर महिलेने एडवोकेट इंद्रजीत परिचारक यांच्या मार्फत भारतीय नागरिक सुविधा कायदा मार्फत खाजगी फिर्याद दाखल केली.

फिर्यादी नागरी सुरक्षा महिलानुसार खाजगी फिर्याद दाखल केल्याने फिर्यादी यांचे वकिलाचे युक्तिवाद कागदपत्र व सर्वोच्च न्यायालयाने न्यायनिवाडे ग्राहक धरून प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी श्रीमती के जे खोमणे यांनी भारतीय नागरिक सुरक्षा सहित कलम १७५,/३ प्रमाणे तपास करून कोर्टाने सदर गुन्ह्याचा रिपोर्ट सादर करण्याबाबत आदेश तयार केले त्यानुसार पोलिसांनी भारतीय संहिता कलम ३१८/१३१८ /४, ३३६(१,) ३३८, ३४०, (५) अनमोल भारतीय आरोपी १) सरस्वती मुस माने २). भैया बंडू अवघडे ३). अनिता महादेव भालेराव.४) राजू विठ्ठल खंडागळे.५) सुनील औदुंबर पाटोळे.६) शशिकांत दिगंबर आटकळे. यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून पोलिसांनी तातडीने येथील आरोपी राजू खंडागळे सुनील पाटोळे शशिकांत आटकळे या आरोपींना अटक करून न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने त्यांना दिनांक १९ नोव्हेंबर पर्यंत पोलीस कोठडीचे आदेश पारित केले आहे. या प्रकरणात तपास शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्रीमती खडके पाटील हे करीत आहेत प्रकरणी फ्रीहरी महिलेच्यावतीने वकील इंद्रजीत परिचारक अँड ओंकार बालकूर. अँड निखिल चिंचोलकर. अँड अतुल मिटकरी हे काम पाहत आहेत.

ऑल इंडिया पँथर सेना पुरस्कृत अधिकृत उमेदवार
कोट

अपक्ष उमेदवार अशोक कसबे यांना मतदारसंघात चांगला प्रतिसाद

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

कळंब/प्रतिनिधी सुधाकर रणदिवे : धाराशिव/ कळंब विधानसभा मतदारसंघाचे अपक्ष उमेदवार अशोक कसबे यांची ना कुठे सभा, न गाड्या, ना कुठला प्रचार, ना कुठे झेंडे, ना पोम्प्लेट, मी सांगितले की मी फक्त माझ्या कामाच्या जोरावरती मी निवडून येत आहे. मी केलेली शेतकरी, शेतमजूर, दीन दलित, बहुजन वर्ग, कुठल्याही जातीपातीवर अन्याय होत असेल तर त्या ठिकाणी ठाम पणे उभा राहणे, हाच माझा मोठा प्रचार आहे, सभा आहेत, आणि जाहिराती आहेत, त्यामुळे माझा कुठलाही प्रचार नाही, याच कामाच्या जोरावरती मी निवडून येणार असे ठाम मत अपक्ष उमेदवार अशोक कसबे यांनी व्यक्त केले आहे. त्यांनी फेसबुकच्या द्वारे ,इंटरनेटच्या द्वारे, व्हाट्सअप च्या द्वारे, गावोगावी फिरून त्यांना फिरण्यासाठी त्यांच्या कार्यकर्त्यांनी ,मित्रांनी त्यांना गाडीसाठी पैसे गोळा करून दिले आहेत. हीच त्यांच्या कामाची मोठी पावती आहे. त्यांनी सांगितले की मी निवडून आल्या आल्या पहिली तालुक्यातील रोडचे काम पूर्ण करेल असे त्यांनी आश्वासन दिले आहे. गोरगरिबांच्या, शेतकऱ्यांच्या, आणि बहुजनांच्या पाठीशी कायमचा सतत उभा राहील. त्यांनी आत्ता पर्यंत खालील गावांना भेटीगाठी दिल्या तिथे त्यांना चांगला आणि मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला आहे. भोसा, तडवळे कसबे, ढोकी, बुकणवाडी, खानापूर, वाघोली, येरमाळा, पानगाव,गौर,वाघोली, उस्मानाबाद, कळंब डिकसळ, इटकुर, घारगाव, कोल्हेगाव, ढोराला, निपाणी, शिराढोण, दहिफळ, शेलगाव, सातेफळ, येडशी, जवळे, येरंडवाडी, भोगजी, देवधाणोरा, खामासवाडी, बरमाची वाडी, वाकडी, हसेगाव, एवढया गावांना भेटी दिल्या तिथे चांगला आणि मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला. त्यांनी लोकांना आश्वासन दिले आहेत मला एकच चान्स द्या त्यानंतर बघा मी तुमची काम कशी करतो, आयुष्यभर तुमच्या पाठीशी राहतो. प्रत्येक गावोगावी जाऊन त्यांचा एकच प्रचार आतापर्यंत कुठल्या आमदारांना काय केलं. आतापर्यंत किती आमदार शेतकऱ्यांचे झाले, शेतकऱ्यांच्या हितासाठी किती कामे केली, गोरगरिबांसाठी किती धावून आले, एकदा निवडून आले की परत पाच पाच वर्षे मतदारसंघात फिरत सुध्दा नाहीत,अशा अनेक टीका त्यांनी केल्या, मी शेतकऱ्यांच लेकरू आहे, मी गरीबाच लेकरू आहे, माझे आई-वडील आणखी दुसऱ्याच्या बांधावर कामाला जातात, याची मला पुर्ण जाणीव आहे. त्यामुळे मी कधीच आयुष्यभर मी कोणालाही विसरणार नाही अशी त्यांनी हमी दिली. त्यामूळे अशोक कसबे यांना प्रत्येक गावागावातून चांगल्या मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे.

सर्व जाती धर्माच्या नागरीकांना व पत्रकारांना एकत्र करून श्री ष ब्र बसवराज शिवाचार्य महास्वामी यांनी केला सन्मान

पत्रकारांचाही केला सन्मान

नळदुर्ग शहरात प्रथमच राजगुरू श्री शिवलिंगेश्वर शिवाचार्य महास्वामीजीच्या मठात सर्वधर्म समभाव कार्यक्रम होतोय संपन्न

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

नळदुर्ग/प्रतिनिधी, दादासाहेब बनसोडे :

सुक्षेत्र ऐतिहासिक नळदुर्ग शहरात प्रथमच सर्व धर्म समभाव या युक्ती भावनेने राजगुरू श्री शिव लिंगेश्वर हिरेमेठ निर्वीकल्प समाधीस्त राजगुरू श्री ष ब्र १०८ शिव लिंगेश्वर शिवाचार्य महास्वामीजी यांच्या स्मरणार्थ नळदुर्ग शहरांमध्ये प्रथमच जगद्गुरु रेणुकाचार्य पंचधातू मुर्ती प्रतिष्ठापना व गुरुमाता अमृत महोत्सवानिमित्त तुलाभार कार्यक्रमाचे आयोजन खूप मोठ्या प्रमाणात करण्यात येत आहे या कार्यक्रमाच्या निमित्ताने राजगुरु श्री शिवलिंगेश्वर शिवाचार्य महास्वामी मठात दररोज हजारोंच्या संख्येने महिला व पुरुष प्रवचन ऐकण्यासाठी उपस्थित राहातात.

दररोज एक एक भक्त महाप्रसादाच्या कार्यक्रमाचे आयोजित करतात व मठात आलेल्या सर्व भक्तांना महाप्रसादाचे वाटप करण्यात येते याच बरोबर नळदुर्ग या ऐतिहासिक शहरातील प्रत्येक जातीच्या प्रतिष्ठीत नागरीकांचा सन्मान सोहळा करण्याचा मानस श्री ष ब्र बसवराज शिवाचार्य महास्वामीजींचा होता त्या प्रमाणे हा कार्यक्रम प्रथमच संपन्न झाला आहे यामध्ये पत्रकारांनी आजतागायत केलेल्या कार्याचा आढावा घेऊन पत्रकारांचा ही सन्मान करण्यात आला.

यावेळी बौद्ध समाजातील प्रतिष्ठीत नागरिक डॉ बाबासाहेब आंबेडकर इंग्लीश मेडीयम स्कुल चे संस्थापक तया मुख्य प्रवर्तक मारुती खारवे, रिपाइं चे जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब बनसोडे, रि पा इं चे नेते तथा सामाजिक कार्यकर्ते प्रमोद कांबळे, माजी सेवानिवृत्त शिक्षक ज्ञानोबा लोंढे, माजी नगरसेवक किशोर बनसोडे, ॲड अभिजीत बनसोडे, यूवा नेते तथा सामाजिक कार्यकर्ते अजयकुमार बागडे, सह शिक्षक सचिन कांबळे, सह नळदुर्ग शहर पत्रकार संघाचे अध्यक्ष सुहास येडगे , सचिव तानाजी जाधव, जेष्ठ पत्रकार विलास येडगे, पत्रकार प्रा पांडुरंग पोळे, पत्रकार उत्तम बनजगोळे, पत्रकार संपादक दादासाहेब बनसोडे, शिवाजी नाईक, लतीफ शेख, पत्रकार प्रा दिपक जगदाळे, पत्रकार भगवंत सुरवसे, पत्रकार आयुब शेख , पत्रकार इरफान काझी, पत्रकार जहीर इनाम दार, पत्रकार संपादक सचिन तोग्गी , पत्रकार अजय अणदूरकर, पत्रकार राजेंद्र स्वामी आदिंचा शाल, टोपा हातरुमाल एक श्रीफळ मिठाई देऊन सत्कार करण्यात आला . यावेळी माजी नगरसेवक विनायक अंहकारी यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक सोसायटीचे माजी चेअरमन दात्तात्रय कोरे यांनी केले.

दि १८ नोहेंबर २०२४ रोजी श्री श्री श्री वीर सोमेश्वर शिवाचार्य महाभगवत्पाद रंभापुरी महास्वामीजी धर्म संदेश सभा होणार आसुन या प्रवचनाचा व कार्यक्रमाचा जास्तीत जास्त नागरीक भक्तानी लाभ घ्यावा आले ही अवहान श्री ष ब्र बसवराज शिवाचार्य महास्वामी जी यांनी केले आहे.

सर्व मानव धर्म एक आहेत ऐवढा मोठा सन्मान करणे म्हणजे प्रबोधनात्मक आखणे आदर्श घेण्या जोगा कार्यक्रम